महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय

राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/ ९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे — १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com

जा.क्र. राकावियो/रुग्णा/मो . नगर/जडसंग्रह विभाग/ ७९०९ /२०२५ दि. - 4 DEC 2025

निविदा सुचना

१. राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, मोहननगर चिंचवड, पुणे येथील विमा रुग्णांशी निगडीत असलेला दस्तऐवज मशनीमध्ये टाकून टुकडे करुन विक्री करण्याकरीता मोहेरबंध पाकिटात निविदा मागवण्यात येत आहेत. सदर निविदा संदर्भात नियम व अटी सोबत जोडल्या आहेत.
२. अधिकृत भंगार/रद्दी खरेदी धारकानां दस्तऐवजाची पाहणी करून सदर निविदा दि.०५.१२.२०२५ ते दि. ११.१२.२०२५ या कालावधीत सकाळी १०.०० ते ४.३० वाजेपर्यंत पोहचतील अशा मोहेरबंध पाकिटामध्ये पाठवाव्यात. विहित वेळेतील प्राप्त निविदा दि. १५.१२.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता वैद्यकीय अधिक्षक यांच्या समक्ष उघडण्यात येतील. निविदा उघडतेवेळी निविदाकारास उपस्थित राहण्यास परवानगी आहे. सदर पुरवठाधारक हजर न राहील्यस त्याच्या गैरहजेरी मध्ये निविदा प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल.याबाबत पुरवठाधारकाचे कोणतेही आक्षेप असल्यास ते मान्य करण्यात येणार नाही. तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्विकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार वैद्यकीय अधीक्षक राज्य कामगार विमा योजना, रुग्णालय मोहननगर, चिंचवड, पुणे यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत. याची कृपया नोंद घ्यावी.

अध्यक्ष तथा वैद्यकीय अधीक्षक
निर्लेखन समिती
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय,
राज्य कामगार विमा योजना,
मोहननगर,चिंचवड, पुणे १९.

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय
सर्व्हे नं - १३०/ ९ - ११, मोहननगर, चिंचवड, पुणे — १९ .
कार्यालय दुरध्वनी क्र.-०२०-२७४६२४८६, ०२०-२७४६२५१४.
ई-मेल- mschinchwad.esis@gmail.com

## निविदा संदर्भातील अटी व शर्ती

१. मोहेरबंद पाकिटात निविदा दि.०५.१२.२०२५ ते दि. ११.१२.२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.३० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वैद्यकीय अधिक्षक राज्य कामगार विमा योजना, मोहननगर,चिंचवड, पुणे १९ येथे सादर करावी. सदर विमा रुग्णांशी निगडीत असलेला दस्तऐंवज नावानिशी स्पष्ट उल्लेख असावा.

२. 'जसे आहे तशा स्थितीत' विक्रिकरीता असलेल्या विमा रुग्णांशी निगडीत असलेला दस्तऐंवज वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय मोहननगर, चिंचवड, पुणे येथील रुग्णालयात ठेवण्यात आले आहे. सदर दस्तऐंवजाच्या निविदा सादर करणाऱ्या इच्छुकाला निविदेमधील दस्तऐंवज पाहण्यासाठी रुग्णालय मोहनगर चिंचवड, पुणे या ठिकाणी जाहिरात दिलेल्या तारखेच्या येणाऱ्या मंगळवारी पाहता येईल. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही दिवशी दस्तऐंवजाची पाहणी करता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

३. ज्यांना रजिस्टर पोष्टाने निविदा पाठवायची आहे. त्यांनी दिनांक ११.१२.२०२५ रोजी ५.०० पर्यंत या कार्यालयास पोहचतील अशा पध्दतीने पाठवावी. अन्यथा वरील कालावधीत समक्ष सादर करावी.

४. इसाऱ्याची रक्कम रु. ५०००/- रक्कमेचा ADMN OF ESIS HOSPITAL MOHANNAGAR. A/C NO.१०१४६१३०८७० या नावाने डिमांड ड्राप्ट करावा.

५. निविदा उघडण्याच्या वेळी निविदाधारक किंवा अधिकृत प्रतिनिधी यांना हजर राहता येईल.

६. यशस्वी निविविदाधारकास, निविदा सफल झाल्याचे कळल्यापासून रोख रक्कम भरुन एका आठवडयात दस्तऐंवज ताब्यात घेणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निविदा रद्द बातल ठरविली जाईल

७. यशस्वी निविदाधारकास,विक्रिकर अधिनियमानुसार दस्तऐंवजचा आवश्यक तो विक्रिकर भरावा लागेल किंवा दस्तऐंवज ताबा मिळण्यापुर्वी कर भरल्याबाबतचा लेखी पुरावा सादर करावा लागेल.

८. यशस्वी निविदाधारक नियम अ अटीनुसार करार पुर्ण होऊ शकत नसल्याचे दिसून आल्यास त्याने सादर केलेलीनिवीदा रद्द समजण्यात येऊन पुढील निवीदाधारकास देण्यात येईल.

९. वैद्यकीय अधिक्षक, राज्य कामगारविमा योजना रुग्णालय, मोहननगर, चिंचवड, पुणे हे कोणतेही कारण न देता कोणतीही किंवा सर्व निविदा फेटाळू शकतात.

१०. सदर दस्तऐंवज खरेदी हस्तांतरण नोंदणीबाबत सर्व प्रक्रिया यशस्वी निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल.

११. प्रशासकीय किंवा तांत्रीक कारणास्तव वरील निविदा सादर करावायाच्या किंवा उघडण्याच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो.

१२. महाराष्ट्र पोल्युशन कंट्रोल बोर्ड या संस्थेचे प्रमाणपत्र/ पॅनकार्ड/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र/इनकमटॅक्स रिटर्ण मागील वर्षाचा/संस्था असल्यास संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र/संस्थेच्या सचिवाचे सहमती पत्र, आधार कार्ड, इत्यादी दस्तऐंवज असणे बंधनकारक आहे. सदर दस्तऐवज बंद पाकिटामध्ये सादर करावे.

१३. ज्यानिविदा धारकाची निविदा मंजूर करण्यात आल्यापासून ७ दिवसाच्या आत सुट्टीचे दिवस वगळून दरपत्रकात नमुद रक्कम भरणा करणे आवश्यक आहे. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

१४. बिमारुग्णाशी निगडीत दस्तऐवज ताब्यात घेताना रुग्णालयाच्या इमारतीचे अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास खरेदी दारास नुकसानीबाबत जबाबदार धरुन संबंधीताकडून नुकसानीची वसूली करण्यात येईल.

१५. खरेदीदारास खरेदी रक्कमेवर नियमाप्रमाणे सर्व प्रकारचे कर व शुल्क भरणे आवश्यक राहील. यामधून कोणत्याही प्रकारची सुट देण्यात येणार नाही. सर्व शुल्क वेगळे स्वतंत्र दाखवावे.

१६. खरेदी प्रक्रियेबाब विक्री मुल्यावर नियमानुसार सेवा व जीएसटी भरण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

१७. दर पत्रकावर खरेदीदाराची स्वाक्षरी असणे बंधनकारक आहे. स्वाक्षरी नसल्यास दरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

अध्यक्ष तथा वैद्यकीय अधीक्षक
निर्लेखन समिती
वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालय,
राज्य कामगार विमा योजना,
मोहननगर, चिंचवड, पुणे १९.